ADFACTORS PR
Knowledge-driven communications


| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | 5 Oct 2018 | Publication: | Punya Nagari (Marathi) |
| Edition: | Pune | Page No: | 8 |
| MAV/CCM: | 79088/49.43 | Circulation: | 31935 |


# आयटी विझ प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात

## हजारहून अधिक शाळांचा सहभाग : बिशप्स शाळेतील अनिकेत. सी व अनिरुद्ध देब यांना विजेतेपद

**पुणे : प्रतिनिधी**

शालेय मुलांसाठीच्या सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान प्रश्ममंजुषा स्पर्धा असलेली टीसीएस आयटी विझ नुकतीच पार पडली. यामध्ये बिशप्स शाळेतील अनिकेत. सी आणि अनिरुद्ध देब यांनी विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत पुण्यातील १००० हून अधिक शाळांनी सहभाग घेतला. विजेत्यांना बार्कलेज युकेचे मुख्य डेटा अधिकारी के. के. गुप्ता व टीसीएस सेंटर हेड सचिन रत्नपारखी यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आली.

यंदाच्या टीसीएस आयटी विझमध्ये टेक ट्रेंड्सचा समावेश होता. ॲनिमेशन सॉफ्टवेअरचा वापर करून गेमिफिकेशनच्या माध्यमातून सादर केलेल्या या टेक ट्रेंडसने प्रेक्षक आणि संघांना जागेवर खिळवून ठेवले. या स्पर्धेत पाच फेऱ्या होत्या. जगभरात प्रचंड परिणाम घडवू पाहणाऱ्या तंत्रज्ञानातील ट्रेंड्सवर या स्पर्धा व्यासपीठात भर

देण्यात आला होता. लिखित प्राथमिक फेरीत निवडून आलेल्या पहिल्या सहा संघांना प्रादेशिक अंतिम फेरीत प्रवेश देण्यात आला होता. हे विजेते पुण्याचे प्रतिनिधीत्व करत भारतभरातील इतर ११ प्रादेशिक विजेत्यांसोबत राष्ट्रीय अंतिम फेरीत स्पर्धेत उतरतील. हे विजेते पुण्याचे प्रतिनिधीत्व करत भारतभरातील इतर ११ प्रादेशिक विजेत्यांसोबत राष्ट्रीय अंतिम फेरीत स्पर्धेत उतरतील.

८ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांमध्ये सक्षम करणाऱ्या तंत्रज्ञान कौशल्यांच्या वाढत्या महत्त्वाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने ही खडतर स्पर्धा वार्षिक ज्ञान स्पर्धेच्या रूपात चालवली जाते. प्रत्येक शाळा दोन-दोन विद्यार्थ्यांचे कितीही संघ यात पाठवू शकते.